


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २१८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२० मार्च २०२५

## थोडक्यात

### नवी मुंबईत सर्वसामान्यांना मिळणार हक्काचे घर

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१९, नवी मुंबई :** नवी मुंबईत घर घेण्याचा विचार करणाऱ्यांना लवकरच आनंदाची बातमी मिळणार आहे. नवी मुंबईत सिडकोची तब्बल ६७ हजार २३५ घरे तयार होण्याच्या मार्गावर आहेत. पुढील सहा महिन्यात सिडकोकडून मोठी लॉटरी निघण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ६७ हजार घरं सिडकोकडून तयार करण्यात येत आहेत. तीन टप्प्यांमध्ये घरांची विक्री करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात २६ हजार घरांची लॉटरी निघणार आहे.

विमानतळ झाल्यानंतर नवी मुंबईतील घरांच्या किंमती गगणाला भिडल्या आहेत. त्यामुळे सर्व सामान्यांचा कल सिडकोच्या घराकडे जास्त असतात. परवडणाऱ्या किंमतीत सिडकोकडून घरं उपलब्ध करून दिली जातात. वाशी, जुईनगर, कळंबोली, खारघर, तळोजा येथे सिडकोची घरं कमी किंमतीत उपलब्ध आहेत. प्रधान मंत्री अवस योजनेअंतर्गत (पीएमएवाय) ईडब्ल्यूएस आणि निम्न-उत्पन्न गट (एलआयजी) साठी हे फ्लॅट्स असतील. वाशी ते तळोजा यादरम्यान येणाऱ्या प्रत्येक रेल्वे स्टेशन आणि बस स्थानकाजवळ घरं बांधण्यात आली आहे. येथील औद्योगिक क्लस्टर्स आणि ट्रान्सपोर्टेशन हबमध्ये काम करणाऱ्यांना हक्काचे घर मिळणार आहे. ६०० एकरमध्ये ३५० इमारती तयार करण्यात येत आहे. प्रत्येक इमारत ही आठ मजली आहे. बामणडोंगरी रेल्वे स्टेशनच्या जवळ सिडकोने ५१०० घरं बांधली आहेत. या घराची किंमत ३० लाख रूपये इतकी आहे. बामणडोंगरीमध्ये खासगी घराच्या किंमतीपेक्षा ही किंमत ४० टक्क्यांनी कमी आहे. त्याशिवाय मुलांसाठी खेळण्यासाठी गार्डनर अन् सोयी सुविधाही आहेत. दरम्यान, नुकतीच २५७०० घरांची सिडकोकडून लॉटरी निघाली होती, यातील १९५०० जणांना घरं देण्यात आली आहेत. २०२७ च्या अखेरपर्यंत सिडकोची सर्व घरं तयार होणार असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितेल. खारघर स्टेशनजवळच्या घराची किंमत ९७ लाख रूपये इतकी आहे, तर तळोजा येथील घराची किंमत २५ लाख रूपये इतकी आहे.

### पनवेलमध्ये आठवड्यातील एक दिवस कोरडा

**दि.१९, पनवेल :** अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे सालाबादाप्रमाणे पनवेल शहरातील नागरिकांना गुरुवारपासून पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे. पनवेल महापालिकेने मंगळवारी याबाबतची जाहीर सूचना प्रसिद्ध करुन कोणत्या जलकुंभावरील पाणी ग्राहकांना आठवड्यातील कोणत्या दिवशी पाणी मिळणार नाही याची सूचना प्रसिद्ध केली आहे. मागील वर्षी २९ डिसेंबरला पाण्याचे नियोजन करावे लागले होते. यंदा मार्च २० पासून पालिकेला नियोजन करावे लागले. पनवेल शहरातील रहिवाशांना ३२ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाण्याची आवश्यकता आहे. देहरंग येथील अप्पासाहेब वेदक धरणातील शिल्लक पाण्याचा साठा संपूर्ण उपसा केला तर मे महिन्यापर्यंत जलाशयातील सर्व पाणी संपून जाईल. यासाठी महापालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) या संस्थांकडून पाताळगंगा नदीतील उसनवारीने पाणी घेऊन पनवेल शहरातील नागरिकांना पुरवठा केला जातो. रविवार आणि सोमवार पाताळगंगा नदीतून मिळणारा पाणी पुरवठा कमी होतो.

# अरबी समुद्रात सातबारा, कापूस, सोयाबीन बुडवले...
# मुंबईत शेतकरी व पोलिसांमध्ये घमासान..

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, बुलडाणा :** मुंबईच्या वेशीवर धडकलेल्या हजारो शेतकऱ्यांना पनवेल नजीकच्या नढळ येथे आज, बुधवारी पहाटेपासून एकाच ठिकाणी पोलिसांनी अडकवून ठेवले. शांततेत आंदोलन करणार आहोत, असे सांगूनही पोलिसांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर आणि शेतकऱ्यांना रोखून धरले. यावेळी शेतकरी आणि पोलिसांमध्ये तणाव निर्माण झाला. रविकांत तुपकर यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांना अटक करण्यात आली. मात्र, बीड येथील कार्यकर्त्यांनी अरबी समुद्रात सातबारा आणि सोयाबीन, कापूस बुडवून प्रतिकात्मक आंदोलन केलेच. बुधवारी दुपारी रखरखत्या उन्हात तुपकर व हजारो महिला-पुरुष शेतकऱ्यांनी पोलिसांचा विरोध झुगारून मुंबईच्या दिशेला जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी मोठ्या संख्येने असलेल्या पोलिस आणि आंदोलक शेतकरी यांच्यात संघर्ष झाला.

हातात दंडूके घेतलेले पोलीस आणि घोषणा देणारे शेतकरी यांच्यात तब्बल तासभर घमासान सुरू होते. आम्हाला गोळ्या घातल्या तरी मागे हटणार नाही असे म्हणत तुपकर भूमिकेवर ठाम होते. यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करत रविकांत तुपकर, ॲड शर्वरी तुपकर, प्रदेशाध्यक्ष राजू कसबे, नारायण लोखंडे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांना अटक केली. आंदोलक १८ मार्चला बुलढाण्यातून अडीचशे गाड्यांनी मुंबईकडे कूच करणार होते. मात्र, आदल्या दिवशी मध्यरात्री कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन त्यांना पोलीस ठाण्यात आणण्यात आले. पोलीस मागावर असल्याने तुपकर भूमिगत होत गनिमी काव्याने मुंबईत दाखल झाले. त्यांच्यापाठोपाठ राज्यभरातील हजारो कार्यकर्ते मिळेल त्या वाहनाने पोलिसांची नजर चुकवत मुंबईत आले.



पनवेल नजिक असलेल्या एका मंदिर संस्थानात शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते आणि महिला मुक्कामी थांबले होते. या ठिकाणी अर्ध्या रात्री खालापूर पोलीस ठाणे व मुंबईतील शेकडो पोलीस दाखल झाले. त्यांनी आंदोलकांना आहे तिथेच थांबवून ठेवले. दरम्यान, दुपार झाली तरी पोलीस बाहेर पडू देत नसल्याने शेवटी तुपकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकऱ्यांनी अरबी समुद्राकडे कूच करण्याचा प्रयत्न केला. अतिशय रखरखत्या उन्हात पोलिस आणि शेतकरी कार्यकर्त्यांमध्ये चांगलाच राडा झाला. तब्बल तासभर पोलीस व शेतकरी यांच्यात संघर्ष सुरू होता.

शेतकरी घोषणा देत पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते तर शेकडो पोलिसांची बटालियन काठ्या आडव्या लावून त्यांना मागे सारत होती. शेवटी तुपकर व त्यांच्या अनेक सहकारी कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक करत खालापूर पोलीस ठाण्यात अटक करून नेले.

**बिडच्या शेतकऱ्यांनी आंदोलन केलेच...**

दरम्यान याउप्परही बीडचे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे शिलेदार कुलदीप करपे व त्यांचे सहकारी बुधवारी दुपारी मुंबई पोलिसांची तटबंदी भेदत बोटीद्वारे अरबी समुद्रात उतरले. त्यांनी अरबी समुद्रात कर्जाचा बोजा असलेल्या सातबारा तसेच घरात पडून असलेला कापूस व सोयाबीन अरबी समुद्रात बुडवले. यावेळी आम्ही कर्जमुक्त होणारच अशा घोषणा दिल्या. तसेच तुपकर व आंदोलक शेतकऱ्यांना खालापूर पोलिसांनी बळाचा वापर करून केलेल्या बेकायदेशीर अटकेचा जाहीर निषेध नोंदवला. गुंगारा देऊन तुपकर समर्थकांनी समुद्रात प्रतिकात्मक आंदोलन केल्याने पोलिसांची तारांबळ उडाली.

## मराठमोळे ऑलिम्पिकपटू गाजविणार दिल्ली, खेलो इंडिया पॅरा स्पर्धेसाठी महाराष्ट्र सज्ज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, दिल्ली :** सलग दुसर्यांदा राजधानी दिल्लीत खेलो इंडिया पॅरा स्पर्धेचा बिगुल गुरूवार २० मार्च रोजी वाजणार असून महाराष्ट्र स्पर्धेसाठी सज्ज झाला आहे.मराठमोळे पॅरीस पॅरा ऑलिम्पिकपटू सुकांत कदम, संदिप सलगर, स्वरूप उन्हाळकर, दिलीप गावीत भाग्यश्री जाधव हे दिल्लीतील स्पर्धेत सुवर्ण पदकांचे दावेदार आहेत.

दुसरी खेलो इंडिया पॅरा स्पर्धा २० ते २७ मार्च दरम्यान दिल्लीत ३ क्रीडा संकुलात रंगणार आहे.आर्चरी, ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, पॉवरलिफ्टिंग, नेमबाजी व टेबलटेनिस या ६ क्रीडाप्रकारात देशभरातील १३०० क्रीडापटू सहभागी झाले आहेत.स्पर्धेसाठी जवाहरलाल नेहरू स्टेडियम, इंदिरा गांधी स्टेडियम व डॉ. कर्णी सिंग शूटींग रेंज सज्ज झाली आहे.स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे ७८ क्रीडापटू पात्र ठरले आहेत. सर्वाधिक ३६ खेळाडू ॲथलेटिक्समध्ये पदकांसाठी झुंजणार आहेत.खेळाडू, प्रशिक्षक व पदाधिकारी असे एकूण १२० जणांचे पथक असणार आहे. गत दिल्लीतील पहिल्या स्पर्धेत महाराष्ट्राने १२ सुवर्ण, ७ रौप्य, १६ कांस्यपदकांसह ३५ पदकांची कमाई केली होती. गत स्पर्धेत महाराष्ट्राला पाचवे स्थान प्राप्त झाले होते. यंदा महाराष्ट्राचे खेळाडू चमकदार कामगिरी करून क्रमवारीत मुसंडी मारतील असा विश्वास पथकप्रमुख मिलिंद दिक्षीत यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्राचा बॅडमिंटन, ॲथलेटिक्स व नेमबाजीचा संघ पुण्यातून रवाना झाला आहे. या संघाला क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडा आयुक्त हिरालाल सोनावणे, सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

बॅडमिंटन स्पर्धेला गुरूवारपासून सुरूवात होत आहे. महाराष्ट्राच्या विजयाची मोहिम बॅडमिंटन कोर्टपासून सुरू होणार आहे. सांगलीचा सुकांत कदम एस एल ४ गटात सुवर्णपदकाचा प्रमुख दावेदार आहेत. जागतिक क्रमवारीत दुसर्या




स्थानावर असणार्या सुकांतने पॅरीस ऑलिम्पिकमध्येही चमकदार कामगिरी केली होती. प्रथमच तो खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत खेळणार आहे. बॅडमिंटनमध्ये निलेश गायकवाड, मार्क धरमाई, प्रेम अले, आरती पाटील या महाराष्ट्राचे खेळाडूंही विजयासाठी मैदानात खेळताना दिसतील.शुक्रवार २१ मार्चपासून ॲथलेटिक्सचा थरार रंगणार आहे. संदिप सलगर, भाग्यश्री जाधव, दिलीप गावीत या पॅरीस ऑलिम्पिकपटूं ॲथलेटिक्सचे मैदान गाजविताना दिसतील. हातावर शस्त्रक्रिया झाल्याने भालाफेकपटू संदिप सलगरला पहिल्या स्पर्धेपासून वंचित रहावे लागले होते.

संदिप प्रथमच खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत खेळणार असून तो सुवर्णपदकासाठी फेकी करताना दिसेल. जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या संदिपची ६७ मीटर ही सर्वोत्तम कामगिरी असल्याने संभाव्य विजेता म्हणून त्याचाच दिल्लीत डंका आहे.

गत स्पर्धेत भालाफेक व गोळाफेकीत दोन सुवर्णपदके जिंकणारी भाग्यश्री जाधव स्पर्धेतील लक्षवेधी खेळाडू ठरणार आहे. सलग दुसर्यांदा दुहेरी सुवर्णपदकासाठी ती सज्ज झाली आहे. ४०० मीटर शर्यत गाजविणारा दिलीप गावीत सलग दुसर्यांदा पदकासाठी उत्सुक आहे. नेमबाजीत कोल्हापूरचा ऑलिम्पिकपटू स्वरूप उन्हाळकर तर आर्चरीत मुंबईचा आशियाई पदकविजेता आदिल अन्सारी हे सलग दुसर्यांदा सुवर्ण पदकाचा वेध घेण्यासाठी सज्ज झाले आहेत.

## एकीकडे पाणीटंचाई, दुसरीकडे रोजगाराची वानवा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, बुलडाणा :** कृषिप्रधान आणि मर्यादित नागरी भागाचा समावेश असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात पाणीटंचाई आणि रोजगाराची तीव्रता वाढली आहे. पाणी टंचाईमुळे हजारो ग्रामस्थांचे हाल होत असतानाच ग्रामीण भागातील मजुरांना रोजगारासाठी सध्या केवळ आणि केवळ रोजगार हमी योजनेचाच आधार असल्याचे चित्र आहे.मागील वर्षी समाधानकारक पावसाने हजेरी लावली. तसेच अवकाळी आणि परतीच्या पावसानेदेखील हजेरी लावली. यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील तेराही तालुक्यात वार्षिक सरासरी इतक्या पावसाची नोंद झाली.

या उप्परही यंदा फेब्रुवारी महिन्यातच पाणीटंचाईने तोंड वर काढले आहे. देऊळगाव राजा आणि मेहकर तालुक्यांतून सुरू झालेल्या टंचाईने आता घाटावरील सहा तालुक्यांत प्रवेश केला आहे. सध्या ८१ गावांची तहान टँकर आणि खासगी अधिग्रहित विहिरींद्वारे भागवली जात आहे. मार्चअखेर किंवा एप्रिलच्या पहिल्या आठवाडयात टंचाईग्रस्त गावांची संख्या १०० पर्यंत जाण्याची दाट शक्यता आहे.

**टँकरने पाणीपुरवठा...**

बुलढाणा जिल्ह्यातील दहा गावांना सध्या बारा टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मेहकर तालुक्यातील पारडी, जवळा, हिवरा साबळे, वरवंड, बुलढाणा तालुक्यातील सैलानी, पिंपळगाव सराई, घाटनांद्रा, पिंपरखेड या गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. याशिवाय देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा गावाला तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

**खासगी विहिरींचा आधार...**

बुलढाणा जिल्ह्यातील सात तालुक्यांतील ७१ गावांची तहान ७६ खासगी अधिग्रहित विहिरींद्वारे भागवली जात आहे. मेहकरमधील ३२ गावांसाठी ३२, सिंदखेड राजामधील १४ गावासाठी १५, बुलढाणा तालुक्यातील ११ गावांसाठी ११, तर देऊळगाव राजा तालुक्यातील नऊ गावांसाठी १३ खासगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

## अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग !!
### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** पंढरपूर भारताची दक्षिण काशी व महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री.विठ्ठल रुक्मिणी देवस्थान म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगपंचमी मोठ्या उत्साहात व पारंपारिक पद्धतीने साजरी करण्यात आली. विठूरायावर केशर आणि गुलालाची उधळण केल्यावर अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग या अभंगाची प्रचिती आली.

वसंतोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे रंगपंचमी. वसंत पंचमी पासून रंगपंचमी पर्यंत दररोज विठूरायाला पांढऱ्या पोशाखावर गुलाल टाकून पूजा केली जाते. सलग महिनाभर हा दिनक्रम सुरु असतो. या उत्सवाची सांगता रंगपंचमीला होते.

रंगपंचमी दिवशी दुपारी ४.३० वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची पाद्यपुजा व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या शुभहस्ते सपत्नीक करण्यात आली. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

देवाच्या अंगावर केशरयुक्त रंग व गुलाल टाकण्यात आला. नंतर डफाची पुजा करुन नामदेव पायरी- तुकाराम भवन - पश्चिम द्वार - चौफाळा - पश्चिम द्वार - व्हीआयपी गेट - नामदेव पायरी अशी मंदिर प्रदक्षिणा करून डफाची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. सदर मिरवणुकीमध्ये रंगाची उधळण करून व मानकऱ्यांना प्रसाद देवून वसंतोत्सवाची सांगता करण्यात आली. या उत्सवाचे सर्व नियोजन विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे व नित्योपचार विभागातील कर्मचाऱ्यांनी केले होते. यावेळी उत्साहात मंदीर समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.

# संपादकीय



## चिमणी..!

चिऊताई चिऊताई दार उघड' आठवतेय ही ओळ. फेसबुक, व्हाट्सअप्प च्या जमान्यात ही बालमित्रांची चिऊताई गायबच झाली आहे.

भारतात सर्वात जास्त संख्या असणारा पक्षी म्हणून चिमणी (नर- चिमणा, मादी-चिमणी) परिचयाची आहे. नर चिमणीच्या कपाळाचा, शेपटीवरचा आणि पार्श्वभाग राखाडी, कानाजवळ पांढरा, चोच काळी, कंठ ते छातीच्या भागावर मोठा काळा भाग, डोक्यापासून खाली पोटाचा भाग पांढरा असून पाठीवर तपकिरी काळ्या तुटक रेषा असतात. मादी मातकट तपकिरी रंगाची असून तिच्या अंगावर काळ्या तपकिरी रंगाच्या तुटक रेषा असतात. तिची चोच फिकट तपकिरी रंगाची असते. तीला भारतात तपकीर असेही म्हटले जाते.

हा पक्षी हिमालयाच्या २००० मी. उंचीपर्यंत, तसेच भारतभर सर्वत्र आढळतो. तसेच बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, म्यानमारसह इतरही देशांत आढळतो. भारतात काश्मिरी आणि वायव्यी अशा हिच्या किमान दोन उपजाती आढळतात.

माणसाच्या अगदी जवळच राहणारा हा पक्षी असून कीटक, धान्य, मध, शिजवलेले अन्न असे सर्व प्रकारचे खाद्य खातो. विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा पक्षी अशी ओळखही या पक्ष्याची आहे. गवत, कापूस, पिसे, मिळतील त्या वस्तू वापरून घराचे छत, वळचणीच्या जागा, दिव्यांच्या मागे, झाडांवर असे कुठेही घरटे बांधतो.

मादी फिकट हिरव्या पांढऱ्या रंगाची, त्यावर तपकिरी ठिपके असलेली ४ ते ५ अंडी देते. अंड्यांच्या रंगात स्थानिक बदलही आहेत. नर-मादी घरटे बांधण्यापासून, अंडी उबविणे, पिलांना खाऊ घालणे वगैरे सर्व कामे मिळून करतात. चिमण्यांचे आयुष्य सहा महिने ते तीन वर्षांपर्यंत असते. ज्ञात असलेली सर्वात वयस्कर वन्य चिमणी जवळपास दोन दशके जगली. त्याचबरोबर नोंद असलेली सर्वात वयस्कर कैदेतील चिमणी २३ वर्षे जगली.

चिमण्यांच्या बाबतीत अशी एक वदंता आहे की, एखाद्या चिमणीला माणसाने पकडले आणि परत सोडले, तर बाकीच्या चिमण्या त्या चिमणीला त्यांच्यामधे घेत नाहीत व चोचीने मारतात किंवा तिला बहिष्कृत करतात; प्रसंगी जीव देखील घेतात.

अलीकडे वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषत: शहरांमध्ये मोबाईल टॉवर्समधून होणारे विद्युत् चुंबकीय उत्सर्जन, आधुनिक प्रकारच्या घरबांधणी पद्धतीमुळे, घरट्यांच्या जागांची अनुपलब्धता, अन्नाची अनुपलब्धता, शहरामधील वाढते प्रदूषण तसेच शेतात होणारा रासायनिक खते व कीटकनाशक यांचा वापर यांसारख्या अनेक कारणांमुळे चिमण्यांची संख्या कमी होत आहे.

२० मार्च हा दिवस दरवर्षी 'जागतिक चिमणी' दिवस म्हणून पाळला जातो. हा दिवस त्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमण्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे, तरी आपण पर्यावरण वाचवू या आणि चिमण्या वाढवू या

# माणसाने माणसाशी माणसासम वागणे...

अरे माणसा माणसा...कधी होशील रे तु माणूस...? असा प्रश्न रोज वृत्तपत्रातील किंवा दूरदर्शन संचावरुन हिंसाचाराच्या घटना वाचून आणि पाहून निर्माण होत आहे. अत्यंत निर्घृणपणे मारहाण करून जीव मारणे, एखाद्याला लोखंडी सळईने चटके देणे, एखाद्याला दोरखंडाने बांधून बेदम मारहाण करणे, लोखंडी रॉडने मारणे... या सर्व घटना एका मागून एक घडत असल्याचे पाहून तळपायाची आग मस्तकाला जाते. ज्याला मारहाण होत आहे त्या व्यक्तीच्या ठिकाणी स्वतःला ठेवून कल्पना तर करवतच नाही. असुरक्षिततेची भावना सामान्य जनतेमध्ये बळावत आहे. हिंसा करणारे हे लोक हिंस्र प्राण्यासारखे का वागत आहेत? असा प्रश्न निर्माण होतो . माणूस इतका आक्रमक का होत आहे? इतका अविवेकी का बनत आहे? दुसऱ्याच्या जीवावर का उठत आहे? माणसातील माणूस पण हरवलय का? या लोकांना कायद्याची भीती राहिली नाही का? असे नाना प्रश्न मनात निर्माण होत आहेत. त्याची सरळ सरळ उत्तर मिळणं अशक्यच आहे. प्रत्येक हिंसाचाराच्या घटनेमागील पार्श्वभूमी वेगळी असली, तरी माणसं कमालीची तापट बनत जात आहेत. संयम हरवत आहेत.त्याचे धाडस भयानक पद्धतीने वाढत आहे.स्वतःची हुकूमत गाजवण्यासाठी किंवा संपत्ती मिळवण्यासाठी, समाजात दहशत बसवण्यासाठी माणसं पुढचा मागचा विचार देखील न करता दुसऱ्याच्या जीवाशी खेळत आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ मध्ये ' जीविताचा अधिकार ' आहे. या कलमात असे म्हटले आहे की, कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेशिवाय कोणत्याही व्यक्तीचे जीवन हिरावून घेतले जाऊ शकत नाही. जीविताचा अधिकार हा फक्त एखाद्याचा जीव वाचवण्यासाठी नाही, तर न्यायालयाने अशी भूमिका घेतली आहे की जिवंत राहण्याचा अधिकार म्हणजे केवळ पशूप्रमाने शारीरिक अस्तित्व कायम राखण्याचा अधिकार नव्हे. मानवी जीवनाला अनुषंगिक असल्यास सर्व किमान गोष्टींनी युक्त असे जीवन जगण्याचा अधिकार या कलमात संरक्षित झाला आहे. अर्थात जगण्यासाठी चांगले आरोग्य, शिक्षण, व्यवसाय आणि इतर सुविधा देण्याची देखील हमी दिली गेली आहे . अशी लोकशाही व्यवस्था आपल्या देशामध्ये असतानाही मध्ययुगीन कालखंडातील किंवा जंगलराज असल्याप्रमाणे काही लोक हिंसाचार करण्याचा प्रयत्न करतात.समाजात असे लोक प्रत्येक कालखंडात होते. दुष्टांचा संहार करून सुष्टांनी सामान्य जणांना न्याय मिळवून दिला होता, हे इतिहास वाचून आपल्या ध्यानात येते. भगवान गौतम बुद्ध आणि अंगुलीमालच्या गोष्टीतून दुष्टाचे हृदय परिवर्तन करून हिंसाचार थांबवल्याचे पाहायला मिळते. अर्थात शांततामय मार्गाने हृदय परिवर्तन करून तसेच कायद्याचा धाक दाखवून हिंसाचार थांबवता येतो. आजच्या काळात देखील अशा दुष्ट लोकांना कायद्याच्या परिभाषेनुसार स्थानबद्ध करणे, मकोका सारख्या कायद्याखाली अटक करून समाजापासून दूर ठेवणं या गोष्टी कायद्याच्या राज्यात होणे अपेक्षित आहे. सामाजिक शांतता राखण्यासाठी शासनाने कठोर होणे आवश्यक आहे. लोकांच्या जीविताला धोका निर्माण करणाऱ्याना हिंसा करण्यापासून परावृत करणे शक्य आहे. हिंसाचार घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा हिंसाचार होण्यापूर्वी अनेक गोष्टी करणे शक्य आहे.हिंसाचार करणे ह्या काही लोकां मधील अपप्रवृत्तीचे दमन करण्याचे उपाय आजच्या घडीला शोधले पाहिजेत. यामध्ये पोलिसांचा धाक बसवणे ; नीतिमान जीवन जगण्याची शिकवण देणे ; अध्यात्मिक शिकवण देणे; शिक्षणाचा प्रसार करणे, आणि मानसोपचार तज्ञांची मदत घेणे इतपत उपायोजना करता येणे शक्य आहे.

माणसावर, माणसाच्या जगण्यावर, त्याच्या माणूसपणावर अतोनात प्रेम करणारा आणि विश्वाला समानतेचा संदेश देणारा कवी म्हणजे नामदेव ढसाळ! त्यांनी आपल्या काव्यातून माणसाने माणसाशी माणसासम कसे वागावे हे पुढील शब्दात सांगितले आहे –

**आभाळाला आजोबा अन्**
**जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीतच**
**गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे**
**चंद्रसूर्य फिके पडतील असे**
**सचेत कार्य करावे**
**एक तीळ सर्वांनी करंडून**
**खावा माणसावरच सुक्त रचावे...**
**माणसाचे गाणे गावे, माणसाने!**

भगवान गौतम बुद्ध, भगवान महावीर, महात्मा गांधी यांनी अहिंसेचे तत्व आपल्याला शिकवले. आज आपण त्या मार्गापासून खूप दूर जात आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील,' रक्ताचा एक थेंब देखील न सांडता परिवर्तन करणे म्हणजेच ' लोकशाही ' अशी लोकशाहीची व्याख्या केली आहे. आज आपण लोकशाही व्यवस्थेमध्ये राहत आहे. या व्यवस्थेमध्ये कोणाचेही रक्त सांडले नाही पाहिजे याची दक्षता आपण सर्वांनी घेतली पाहिजे. शाळेमध्ये शिकवल्या जाणाऱ्या अनेक प्रार्थना नव्या पिढीवर संस्कार म्हणून रुजवल्या पाहिजेत. कारण योग्य वयातील योग्य संस्कारातून समाजातील अनेक अपप्रवृत्तींना घालवता येतात ...म्हणून ' माणसाने माणसाशी माणसासम वागणे...' ही प्रार्थना म्हणून नव्हे तर संस्कार गीत म्हणून फक्त शाळेतच नव्हे तर विविध समारंभात आणि उत्सवात गायली पाहिजे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# ठाणे सरस विक्री प्रदर्शनात ग्रामीण भागातील महिलांच्या उत्पादनांच्या विक्रीने गाठला ६६.३१ लक्ष चा विक्रमी उच्चांक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, ठाणे :** जिल्हा ठाणे अंतर्गत स्वयं सहाय्यता समुहातील महिलांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या उद्देशाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग डॉ. विजय सुर्यवंशी (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी अशोक शिनगारे (भा.प्र.से.) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रोहन घुगे (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय आयुक्त कार्यालय कोकण विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम) यांच्या संयुक्त विद्यमाने वज्रेश्वरी महोत्सव कोकण सरस, जिल्हास्तरीय सरस व मिनी सरस विक्री प्रदर्शन दि.१२ ते १६ मार्च २०२५ दरम्यान, गावदेवी मैदान ठाणे स्टेशन रोड ठाणे (प) येथे आयोजित करण्यात आला होता.

खास करून महिलांनी स्वतः बनवलेल्या विविध खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, कपडे आणि घरगुती वापराच्या विविध वस्तूंचे १८८ स्टॉल लावण्यात आले होते. त्यात



४५० हून अधिक महिलांचा सहभाग होता. यापैकी १९ फूड स्टॉल (खाद्यपदार्थाचे स्टॉल) व १६९ हस्तकला वस्तू, कपडे आणि घरगुती वापराच्या विविध वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले होते. सरस प्रदर्शनास मुंबई, मुंबई उपनगरे व ठाणे तसेच इतर जिल्हयातील जवळपास १५,००० ग्राहकांनी भेट दिली व उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन खरेदी केली.

स्वयं सहाय्यता समुहातील महिलांनी बनविलेल्या वस्तूंची ६६.३१ लक्ष ची विक्रमी विक्री या प्रदर्शनात झाली, अशी माहिती प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, ठाणे छायादेवी शिसोदे यांनी दिली.

# हमरापुर येथे शिवजयंती साजरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, पेण :** पेण तालुक्यातील हमरापुर गावात छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती मोठया उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली.

शिवप्रेमी सेवा संघ हमरापुर व ग्रामस्थ मंडळ हमरापुर यांच्यातर्फे गेले वीस वर्ष गावात दोन दिवस छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या जल्लोषाने उत्साहात साजरी केली जाते.

यावर्षी किल्ले रायगड ते हमरापूर अशी शिवज्योत आणण्यात आली. त्यात गावातील अनेक तरुण व तरुणी सहभागी झाले होते. सोमवारी रात्री गावातून चलचित्रासह सहवाद्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. त्यात सरपंच राकेश दाभाडे, उपसरपंच रविंद्र शेदवल, शिवप्रेमी सेवा संघाचे अध्यक्ष अक्षय दाभाडे, उपाध्यक्ष पप्पू नाईक, तंटामुक्ती संघटनेचे अध्यक्ष विश्वास पाटील, अशोक एरंडे, चंद्रकांत भगत, बबन चव्हाण, विनोद नाईक, संदेश कदम, कृष्णा गोळीमडे, सचिन गोळीमडे, दिनेश पाटील, किरण मांगरुळकर, सुरेश एनपुरे, सुधीर गोळीमडे यांच्यासह गावातील महिला, तरुण, तरुणी मोठया संख्येने सामील झाले होते.

## दंगलग्रस्त..

आकांत बहिरे कानी
होई शहरे दंगलग्रस्त
कळत नाही कुणाचा
तो बलदंड वरदहस्त

जनतेच्यामालमत्तेचा
हो विध्वंस जबरदस्त
वाट पाहतो दंगलीचा
रे कधी होणारं अस्त

दारां फिरतो यमराज
मरणां बनवले स्वस्त
दंगली घडवणारी मने
नीत राहिली अस्वस्थ

कधी कारण धर्मजात
अकारण दंगली रास्त
दंगलीमागेराजकारण
पेटव राज्य बिनधास्त


दंगली रोखू शकणारे
कसे राहतात भिडस्त
रे दंगली अक्षम्य चुका
कधी न होईल दुरुस्त

काय करायचे आम्हां
स्वता स्वतात व्यस्त
आत्मकेंद्रित नागरिक
रे बनतात दंगलग्रस्त

रखवाली करणारे का
निद्रिस्त पडले सुस्त
मनातली तीव्र आस्था
सत्तेवर हो आसनस्थ

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# उन्हाळ्यात पशु-पक्षांची काळजी घेऊया !



लोकसंख्या जशी वाढत गेली तशी माणसाच्या मूलभूत गरजा पुरवणारी नैसर्गिक साधने कमी पडू लागली. शहरासारख्या ठिकाणी राहण्यासाठी टोलेजंग इमारती उभारल्या जाऊ लागल्या, वाहतुकीसाठी नवनवीन महामार्ग, उड्डाणपूल तयार केले जाऊ लागले, वीजनिर्मितीसाठी निरनिराळे प्रकल्प उभारले जाऊ लागले आणि यासर्व बाबींना 'विकास' असे गोंडस नाव दिले गेले. मागील ३०-४० वर्षांत विकासाच्या नावाखाली झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल करण्यात आली आहे. नैसर्गिक संपत्तीवर जीवन असलेल्या प्राणिमात्रांचे, पशुपक्षांचे जीवन मात्र यामुळे धोक्यात येऊ लागले.

लोकवस्त्या निर्माण करण्यासाठी मानवाने जंगलांवर अतिक्रमण केले, डोंगर नद्या कह्यात घेतल्या. बुद्धिमान मनुष्यप्राण्यापुढे आपले काही चालणार नाही म्हणून प्राण्यांनी आपली स्थाने बदलली. गेल्या दहा-बारा वर्षांत देशासह राज्यात नैसर्गिक कोप झाल्यासारखी परिस्थिती उद्भवू लागली आहे. ऋतुचक्रात फेरफार होऊ लागला आहे. अतिवृष्टीनंतर यंदा सर्वांना उष्माघाताचा सामना करावा लागत आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपत्तीवर केलेल्या अतिक्रमणाचेच हे दुष्परिणाम आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. उन्हाच्या तडाख्यामुळे आज मनुष्यप्राणी हवालदिल झाला असला, तरी कृत्रिम थंडावा निर्माण करण्यासाठी त्याच्याकडे पंखे, कुलर, वातानुकूलित यंत्रे यांसारखी आधुनिक साधने आहेत, पशुपक्षांना मात्र सर्वस्वी नैसर्गिक थंडाव्यावर अवलंबून राहावे लागते. शहरासारख्या ठिकाणी वृक्षतोडीमुळे हा गारवा नष्ट झाला आहे. अन्नाच्या आणि पाण्याच्या शोधात मानवी वस्त्यांत, शहरांत येणाऱ्या पक्षांना उष्माघाताचा सामना करावा लागतो. गेल्या वर्षी उन्हाळ्यात नवीमुंबई, ठाणे आणि रायगड परिसरात प्रतिदिन १०० हुन अधिक प्राणी-पक्षी घायाळ होत होते तर रोज १५ ते २० पक्षांचा आणि प्राण्यांचा मृत्यू होत होता. अन्य शहरांतही काहीशी अशीच स्थिती होती. अन्न-पाण्याच्या शोधात प्रखर उन्हातून फिरताना हे पक्षी चक्कर येऊन जमिनीवर कोसळतात ज्यामुळे त्यांच्या पंखांना आणि पायांना इजा होते. अशा जखमी अवस्थेत कोसळलेल्या पक्षांवर कुत्रे मांजरी हल्ला करतात त्यामळे त्यांची परिस्थिती आणखी बिघडते. वटवाघूळ, माकडे, खार, कोकिळा, पोपट, घार, कावळे, चिमण्या यांसारखे पशु पक्षी प्रतिदिन घायाळ होऊन रस्त्यांवर पडत आहेत. पशु पक्षांवर ही जी काही प्रतिकूल परिस्थिती ओढवली आहे त्याला सर्वस्वी मानव जबाबदार असून त्याचे प्रायश्चित्त म्हणून उष्णतेने हवालदिल झालेल्या या पशु पक्षांसाठी प्रत्येकाने काहीनाकाही करायला हवे. आपल्या घराच्या खिडकीमध्ये, बाल्कनीमध्ये पक्षांना सहज उपलब्ध होईल असे धान्य, खाद्य आणि पाण्याची व्यवस्था करा तसेच ते पाणी नियमितपणे बदला. काही पक्षीमित्र संघटना या दिवसांत पशुपक्षांसाठी ठिकठिकाणी कृत्रिम पाणवठे आणि खाद्याची व्यवस्था करत आहेत. अपुऱ्या निधीमुळे यांना त्यांच्या कार्यात मर्यादा येत आहेत अशा संघटनांशी संपर्क साधून त्यांना सहकार्य करा ! रस्त्यावर कुठे घायाळ अवस्थेतील पक्षी किंवा प्राणी दिसून आला,तर त्याला त्वरित वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी प्रयत्न करा. एरव्ही प्राणिसंग्रहालयांत आनंदाने बागडणारे पशु पक्षी आपणा सर्वांनाच आवडतात. प्राणिसंग्रहालयातील पशु पक्षांना व्यवस्थापनाकडून नियमितपणे पाणी आणि खाद्य पुरवले जाते मात्र बाहेर स्वच्छंदपणे वावरणाऱ्या पशु पक्षांना आपल्या आणि आपल्या पिल्लांच्या अन्न आणि पाण्याच्या शोधात वणवण फिरावे लागते. आज त्यांच्यावर उद्भवलेल्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांना दिलेला अल्पसा आधारही त्यांचे जीवन वाचवू शकतो त्यामुळे ही संधी आपण सोडता कामा नये !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## चिपळूणात २५ ते २७ मार्च २०२५ रोजी नमन लोककला महोत्सवाचे आयोजन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१८, चिपळूण (रत्नागिरी) :** कोकणातील नमन लोककलेच्या सन्मानार्थ शासनाकडून प्रतिसाद मिळत असून, गतवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय वतीने नमन लोककला महोत्सव -२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २५ ते २७ मार्च २०२५ रोजी, सायंकाळी ०६ : ३० वा, इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र, मार्कंडी, (चिपळूण-कराड रोड), चिपळूण याठिकाणी सदर महोत्सव २०२५ संपन्न होणार आहे. प्रवेश विनामूल्य असून सदर महोत्सवात मंगळवार, दिनांक २५ मार्च : १ ) बालमित्र नमन मंडळ, कोंडये देवळाचीवाडी,ता.संगमेश्वर, २) श्री काळभैरव नमन नाट्य मंडळ वाडदई (वरची वाडी) ता.गुहागर तसेच बुधवार, दिनांक २६ मार्च : १) श्री मठबाबा नमन मंडळ ,रुण ता.लांजा, २) हौशी कलावंत नाट्य नमन मंडळ, भू पंचक्रोशी, ता.राजापूर,३) सहयाद्री मार्लेश्वर कलामंच,देवरूख,ता. संगमेश्वर, ४) श्री हनुमान भक्त सेवा मंडळ, फणसवळे ता.रत्नागिरी आणि गुरुवार, दिनांक २७ मार्च: १ ) श्रीराम नाट्य नमन मंडळ, कामथे-हुमणे वाडी, ता.चिपळूण, २) नवयुग सेवा नमन मंडळ, आसगे,मांडवकर वाडी, ता.लांजा, ३) श्री रासाई उत्कर्ष नमन मंडळ,कुवे, ता.लांजा, ४) शिवभक्त कोकण लोकनाट्य नमन मंडळ, ता.संगमेश्वर,असे एकूण १० नमन मंडळांना आपली कला सादर करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

## वीज पुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून नवीन प्रकल्प कार्यान्वित होणार

**दि.१९, मुंबई :** राज्यातील वीज निर्मिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून टप्प्याटप्प्याने नवीन प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. तसेच भविष्यात वीज पुरवठा अधिक सक्षम केला जाईल, असे ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानपरिषदेत सांगितले.

राज्यात महानिर्मितीचे पाच संच बंद असल्याने विजेचा तुटवडा निर्माण होत असल्याबद्दल सदस्य मनिषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर बोलत होत्या.

राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले की, वीज निर्मिती संच बंद असण्याची ही पहिली वेळ नसून नियमित देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी काही संच बंद ठेवावे लागतात तसेच तांत्रिक बिघाडांमुळे काही संच बंद राहतात.

प्लान्ट लोड फॅक्टर (PLF) बाबत महाराष्ट्राचा दर हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च दर आहे. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार २०३० पर्यंत काही जुने प्रकल्प चालू ठेवण्याची गरज आहे. त्यामुळे सरकार आणि खासगी वीज निर्मिती कंपन्यांची तुलना योग्य नाही, असे त्यांनी सांगितले.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी स्पष्ट केले की, जानेवारी महिन्यात ८२.५ दशलक्ष युनिट वीज खरेदी करण्यात आली असून तिचा दर ३.३१ रुपये प्रति युनिट होता. हा दर खासगी कंपन्यांच्या तुलनेत अधिक नव्हता. तसेच, सरकारकडील जुने वीज प्रकल्प टप्प्याटप्प्याने नव्या तंत्रज्ञानाने अद्ययावत केले जात आहेत. भुसावळ येथे ६६० मेगावॅटचा नवीन प्रकल्प कार्यान्वित होत असून, चंद्रपूरमध्ये ८०० मेगावॅटचा प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचे राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

## कल्याण येथील विशाल गवळीवरील गुन्हा दाखल प्रकरणी पोलीस विभागाकडून हलगर्जीपणा नाही

**दि.१९, मुंबई :** ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील आरोपी विशाल गवळीवर विनयभंगाचे व इतर असे एकूण नऊ गुन्हे कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत. या गुन्ह्यांमध्ये आरोपी विशाल गवळी व अन्य पाच ते सहा गुन्हेगारांनी मानसिक रुग्ण असल्याच्या प्रमाणपत्राआधारे विनयभंग, छेडछाड अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये जामीन मिळविल्याचे आढळून आलेले नाही. तसेच या प्रकरणी पोलीस विभागाने हलगर्जीपणा केलेला नाही. त्यामुळे त्याबाबतची चौकशी करण्याची आवश्यकता नसल्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य शशिकांत शिंदे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. सदस्य ॲड. अनिल परब यांनी या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सहभाग घेतला.

गृहराज्यमंत्री श्री.कदम म्हणाले, विशाल गवळीवर एकूण नऊ गुन्हे दाखल असून त्यातील आठ गुन्ह्यांमध्ये जामीन प्राप्त झालेला आहे. तर, एका गुन्ह्यामध्ये विशाल गवळी सध्या अटकेत आहे. त्यास मानसिक रुग्ण म्हणून जामीन मिळालेला नाही. विशाल गवळीला पाठीशी घालण्याचा प्रश्नच येत नसून त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. त्याच्यावर एमपीआयडी सारखा गुन्हा दाखल करता येईल का, हे देखील तपासून पाहिले जाईल, असेही श्री.कदम यांनी सांगितले.

## दोन पोलिसांना लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक

**दि.१९, मुंबई :** गुन्ह्यांत मदत करण्यासाठी व चारचाकी गाडी सोडवण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याच्या आरोपाखाली सहाय्यक फौजदार सुनील महादेव देसाई (५१) व पोलीस शिपाई विक्रम अतुल शेंडगे (३१) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. दोघेही बोरिवली येथील एमएचबी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. दोन्ही आरोपींना न्यायालयापुढे हजर करण्यात आले असता त्यांना दोन दिवसांची एसीबी कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती एसीबीकडून देण्यात आली. याप्रकरणी अधिक तपास करण्यात येत आहे. याबाबत एसीबीकडून मिळालेल्या माहिनुसार, तक्रारदारांच्या विरोधात अपघात केल्याप्रकरणी १६ मार्च, २०२५ रोजी बोरिवली येथील एमएचबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणात मदत करण्यासाठी तसेच गुन्ह्यांत जप्त करण्यात आलेली तक्रारदाराचे चारचाकी वाहन सोडवण्यासाठी आरोपी सहाय्यक फौजदार सुनील देसाई याने लाचेची मागणी केली होती. पण तक्रारदारांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी मंगळवार, १८ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे जाऊन तक्रार केली. एसीबीच्या अधिकाऱ्यांनीही तात्काळ तक्रारीची नोंद करून याप्रकरणी तक्रारदारांनी केलेल्या आरोपींची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मंगलवारी एसीबीकडून पडताळणी करण्यात आली. त्यावेळी देसाई यांनी तक्रारदारांकडे लाचेची मागमी केल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी सुरूवातीला ३५ हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती २० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य करण्यात आले. पडताळणीनंतर एसीबीने तात्काळ सापळा रचला. त्यावेळी २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पोलीस शिपाई विक्रम शेंडगे यांना पकडण्यात आले.

## आजपासून नाथषष्ठीयात्रा महोत्सवास प्रारंभ; प्रशासनाकडून आलेल्या दिंड्यांचे स्वागत

### 'भानुदास एकनाथ'च्या जयघोषात शेकडो दिंड्यांचेनाथ नगरीत आगमन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पैठण (छ.संभाजीनगर) :** येथील शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांच्या नाथषष्ठी यात्रा महोत्सवाला आजपासून दिनांक २० मार्च २०२५ रोजी प्रारंभ होत असून महोत्सवाच्या पुर्वसंध्येला लाखो वारकरी भगवे झेंडे खांद्यावर घेऊन टाळ - मृदंगाच्या गजरात भानुदास एकनाथच्या जयघोषात शेकडो दिंड्यांमधून लाखो वारकरी पैठणनगरीत दाखल झाले आहे.



बुधवार, दिनांक १९ मार्च २०२५ नाथषष्ठीसाठी पैठण नगरीत दाखल झालेल्या दिंड्यांचे नगर परिषद व प्रशासनातर्फे मुख्याधिकारी संतोष आगळे, उपविभागीय अधिकारी निलम बाफना, तहसीलदार दत्ता भारस्कर, उपविभागीय पोलीस अधिकारी सिध्देश्वर भोरे पो.नि.संजय देशमुख, पाटबंधारे विभागाचे अभियंता विजय काकडे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन प्रशासनाच्या वतीने स्वागत केले.

दि.२० मार्च ते २२ मार्च या तीन दिवसांच्या कालावधीत लाखो वारकरी व भाविक नाथांच्या चरणी लीन होऊन भजन कीर्तन प्रवचन आदी धार्मिक कार्यक्रमात रममाण होतात. यंदा नाथषष्ठी महोत्सवाला ६०० दिंड्यांची नोंदणी झाली असून ५ ते ६ लाख वारकरी पैठण नगरीत दाखल होणार असल्याने स्थानिक नगर परिषद पोलीस व प्रशासन वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी सज्ज झाले आहे. नगर परिषद कडून वारकऱ्यांना फडासाठी जागा उपलब्ध करुन देणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता आदी सुविधा देण्यासाठी काळजी घेत आहे. तर पोलीस दलाने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. लाखो वारकऱ्यांच्याआगमनाने नाथ मंदिर परिसर, गोदावरी वाळवंटासह पैठणनगरी अक्षरक्ष: भक्तीमय झाली आहे. विविध ठिकाणावरुन नाथषष्ठीसाठी आलेल्या दिंड्या रात्री उशिरापर्यंत आपल्या फडावर दाखल होत आहेत. यात्रामहोत्सवयशस्वी होण्यासाठी आमदार विलास भुमरे विशेष लक्ष ठेवून आहेत. आलेल्या वारकऱ्यांना सुविधा पुरविण्याचे आदेश आमदार भुमरे यांनी प्रशासनाच्या विविध विभागांना दिले आहेत. आलेल्या दिंड्या गोदावरी वाळवंट दक्षिण काशी मैदान, मंदिर परिसर, विविध मठ व शहराच्या अनेक भागात उभारलेल्या आपल्या फडात दाखल झाल्या आहेत.पैठण नगरीत आलेल्या वारकऱ्यांच्यासोयीसाठी नगर परिषदने यात्रा कॅम्प उघडले आहे. याठिकाणी पोलीस खाते, महसूल, महावितरण व आरोग्य विभागाकडून वारकऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. षष्ठीच्या दिवशी दुपारी आतील नाथमंदिरातून नाथवंशजांच्या नेतृत्वाखाली पहिली दिंडी (निर्याण दिंडी) काढण्यात येईल. या दिंडीमध्ये विविध ठिकाणांहून आलेल्या शेकडो दिंड्यातील वारकरीसहभागी होतात. पहिली दिंडी नाथांच्या राहत्या घरापासून (आतीलनाथमंदिर) येथून नवग्रह मंदिर, पिठुंबरा गल्ली, उदासी महाराज मठ, गागाभट चौक अशी नगर प्रदक्षिणा करीत गोदावरी नदीपात्र मार्गे बाहेरीलनाथमंदिरात जाते. तेथे दिंडीकरी नाथ समाधीचे दर्शन घेतात. दुसऱ्या दिवशी मध्यरात्री नाथांच्या पादुकांची छबिना पालखी काढण्यात येते. यात लाखो वारकरी सहभागी होतात.

नाथषष्ठी यात्रा महोत्सवयशस्वी करण्यासाठी आमदार विलास भुमरे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधिक्षक अन्नपूर्णा सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली न.प. प्रशासक तथा मुख्याधिकारी संतोष आगळे, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, उपविभागीय पोलिस अधिकारी सिध्देश्वर भोरे, पो. नि. संजय देशमुख, न.प. पाणीपुरवठा विभाग प्रमुख व्यंकटी पापुलवार, उपमुख्याधिकारी गर्जे, स्वच्छता निरीक्षक धर्मराज उजगिरे, अशोक पगारे, महेश वाळुंज, चंद्रकांत पगारे, अशोक मगरे, पाटीलबा घुले यांच्यासह विविध विभागांचे कर्मचारी परिश्रम घेत.

## माथेरान पर्यटकांसाठी खुले; आमदार थोरवे यांच्या नेतृत्वाखाली तोडगा

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१९, माथेरान :** दस्तुरी नाक्यावरील पर्यटकांची होणारे फसवणूक थांबवण्याबाबत माथेरान कृती समितीने माथेरान प्रशासनाला लेखी निवेदन दिले होते.

निवेदनाचे प्रशासनाकडून १० दिवस उलटून गेले तरी कोणती उपाययोजना न केल्यामुळे शेवटी १८ तारखेला उस्फूर्तपणे माथेरान कृती समितीने माथेरान बंद केले. यामध्ये माथेरान मधील विविध संघटनांनी पक्षांनी पाठिंबा दर्शविला होता. माथेरान बंद होताच याची सर्व स्तरावर माथेरानचे नाव बदनाम होत गेलं याची दखल शासनाने घेत कर्जत खालापूरचे स्थानिक आमदार महेंद्र शेठ थोरवे यांच्या नेतृत्वाखाली प्रांत ऑफिस, माथेरान तहसीलदार,



माथेरान पोलीस स्टेशन सहाय्यक निरीक्षक, वन विभागाचे अधिकारी व माथेरान कृती समिती ,नेरळ माथेरान टॅक्सी युनियन, अश्वपाल दोन्ही संघटना. कुली संघटना. ई रिक्षा संघटना, यांची माथेरान बाळासाहेब ठाकरे सभागृहा एक संयुक्त बैठक आयोजित करून सर्व संघटनांचे विचार मत ऐकून घेऊन यावर तोडगा काढण्यात आला.

पर्यटन व्यवसाय सुरळीत सुरू राहावा. यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असून अनेक सूचना अटी प्रशासकीय संमतीने मंजूर करून दस्तुरी नाक्यावर सुसज्ज माथेरान माहिती केंद्र, पर्यटकांना साठी मुख्य गेटमधूनच प्रवेश तसेच पार्किंग क्षेत्रामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लवकरात लवकर दुरुस्त करून लावणे, पर्यटकांना उपयुक्त असे माहिती फलक ठिकठिकाणी लावणे, पर्यटकांच्या गाडीच्या पाठी कोणीही धावण्यास मज्जाव करण्यात आले आहे, घोडेवाले रिक्षावाले कुली रूम हॉटेल एजंट, ई रिक्षा स्टॅन्ड जवळच समोर राहतील तिथेच घोडे राहतील सर्व घोडेवाल्यांना हॉटेल्स रूम, एजंट ना आयडी कार्ड असावे. प्रशासनाने तेथील ज्या उपाययोजना सुचविले आहे.

त्या टप्प्याटप्प्याने लवकरात लवकर पूर्ण करायच्या आहेत आपापसात वाद होण्यापेक्षा प्रशासन आणि प्रत्येक संघटनेचे संघटनेचे दोन दोन प्रतिनिधी अशी एक कमिटी संघटित करण्याचे सूचित केले आहे. ही कमिटी दर महिन्याला मीटिंग घेऊन काही समस्या असेल त्या बसून चर्चा करून सोडवण्यात येतील.

त्यामुळे पुन्हा असे वाद निमर्ण होणार नाही. कर्जत खालापूर कार्यकुशल आमदार महेंद्र शेठ थोरवे यांच्या मार्गदर्शन मध्यस्थीमुळे आज माथेरान बंद मागे घेण्यात आला. तूर्तास माथेरान बंद मागे घेण्यासाठी सर्व संघटनांनी सहकार्य केल.

## रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या सर्व शाळेत फातिमा शेख यांची प्रतिमा लावा - मुझम्मिल काझी

### रत्नागिरी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१८, रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदच्या सर्व शाळांत फातिमा शेख यांची प्रतिमा लावण्यात यावी अशी मागणी गाव विकास समितीचे रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष मुझम्मील काझी यांनी केली आहे.

गाव विकास समितीचे अध्यक्ष उदय गोताड, संघटन प्रमुख सुहास खंडागळे, उपाध्यक्ष राहुल यादव, मंगेश धावडे, सरचिटणीस मंगेश कांगणे, जिल्हाध्यक्ष श्यामकर्ण भोपळकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुझम्मील काझी यांनी रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या



मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे सदर मागणी केली.

मुझम्मील काझी यांनी निवेदनात म्हटले आहे की, रत्नागिरी जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या व सावित्रीबाई फुले यांच्या सहकारी असणाऱ्या फातिमा शेख यांचा फोटो लावण्याबाबत आपण आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा. अशी आमची आपणाकडे या पत्राद्वारे विनंती आहे.

महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यामुळे सर्वसामान्यांसाठी शिक्षणाची दारे खुली झाली. फुले दांपत्याला शिक्षण क्षेत्रात सहकार्य करणाऱ्या व सावित्रीबाई फुले यांच्याप्रमाणेच त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून काम करणाऱ्या फातिमा शेख यांचे कार्य कर्तृत्व नव्या पिढीला माहीत व्हावे. यासाठी इतर महापुरुषांप्रमाणेच फातिमा शेख यांचा फोटो देखील मराठी शाळांमध्ये लावण्याबाबत निर्णय व्हावा. अशी आपणाकडे विनंती आहे. तसेच मुझम्मील काझी यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, फातिमा शेख या पहिल्या मुस्लिम शिक्षिका आहेत.

आमची हीच मागणी आहे की, आजच्या पिढीला फातिमा शेख यांचा इतिहास तसेच त्यांचे कार्य माहीत नाही आहे. ते विद्यार्थ्यांना कळावे. यासाठी फातिमा शेख यांची प्रतिमा लावण्यात यावी. तसेच त्यांची जयंती आणि पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात यावी. असेही काझी यांनी म्हटले आहे.

## नवी मुंबईत सर्वसामान्यांना मिळणार हक्काचे घर

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१९, नवी मुंबई :** नवी मुंबईत घर घेण्याचा विचार करणाऱ्यांना लवकरच आनंदाची बातमी मिळणार आहे. नवी मुंबईत सिडकोची तब्बल ६७ हजार २३५ घरे तयार होण्याच्या मार्गावर आहेत. पुढील सहा महिन्यात सिडकोकडून मोठी लॉटरी निघण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ६७ हजार घरं सिडकोकडून तयार करण्यात येत आहेत. तीन टप्प्यांमध्ये घरांची विक्री करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात २६ हजार घरांची लॉटरी निघणार आहे.

विमानतळ झाल्यानंतर नवी मुंबईतील घरांच्या किंमती गगणाला भिडल्या आहेत. त्यामुळे सर्व सामन्यांचा कल सिडकोच्या घराकडे जास्त असतात. परवडणाऱ्या किंमतीत सिडकोकडून घरं उपलब्ध करून दिली जातात. वाशी, जुईनगर, कळंबोली, खारघर, तळोजा येथे सिडकोची घरं कमी किंमतीत उपलब्ध आहेत. प्रधान मंत्री अवस योजनेअंतर्गत (पीएमएवाय) ईडब्ल्यूएस आणि निम्न-उत्पन्न गट (एलआयजी) साठी हे फ्लॅट्स असतील. वाशी ते तळोजा यादरम्यान येणाऱ्या प्रत्येक रेल्वे स्टेशन आणि बस स्थानकाजवळ घरं बांधण्यात आली आहे. येथील औद्योगिक क्लस्टर्स आणि ट्रान्सपोर्टेशन हबमध्ये काम करणाऱ्यांना हक्काचे घर मिळणार आहे. ६०० एकरमध्ये ३५० इमारती तयार करण्यात येत आहे. प्रत्येक इमारत ही आठ मजली आहे. बामणडोंगरी रेल्वे स्टेशनच्या जवळ सिडकोने ५१०० घरं बांधली आहेत. या घराची किंमत ३० लाख रूपये इतकी आहे. बामणडोंगरीमध्ये खासगी घराच्या किंमतीपेक्षा ही किंमत ४० टक्क्यांनी कमी आहे. त्याशिवाय मुलांसाठी खेळण्यासाठी गार्डनर अन् सोयी सुविधाही आहेत. दरम्यान, नुकतीच २५७०० घरांची सिडकोकडून लॉटरी निघाली होती, यातील १९५०० जणांना घरं देण्यात आली आहेत. २०२७ च्या अखेरपर्यंत सिडकोची सर्व घरं तयार होणार असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितेल. खारघर स्टेशनजवळच्या घराची किंमत ९७ लाख रूपये इतकी आहे, तर तळोजा येथील घराची किंमत २५ लाख रूपये इतकी आहे.

# चंद्रभागा नदी प्रदूषणाचा मुद्दा विधानसभेत गाजला

## आ.अभिजीत पाटील यांचे आक्रमकतेने सरकारवर दबाव

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१९. पंढरपूर :** पंढरपूर येथील चंद्रभागा नदी हि साचलेल्या पाण्यात शेवाळे, किडे, जलपर्णीमुळे दूषित झाली आहे. विशेष म्हणजे पंढरीत विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी येणारे भाविक अशा दूषित पाण्यात श्रद्धेने स्नान करतात. मात्र या प्रकारावर प्रशासन आणि राज्य शासन कानाडोळा करत असल्याने माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील हे विधानसभा सभागृहात चांगलेच आक्रमक झाल्याने सरकारवर दबाव आल्याचे चित्र पहावयास मिळाले.जेव्हा नव्हते चराचर तेव्हा होते पंढरपूरजेव्हा नव्हती गोदा गंगा तेव्हा होती चंद्रभागा. असा उल्लेख वारकरी संप्रदायात केला जातो.

इथे आल्यावर चंद्रभागा स्नान, नगरप्रदक्षिणा, देवाचे दर्शन याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चंद्रभागा नदी ही दिवसेंदिवस प्रदूषित होत आहे. जलशुद्धीकरण योजनेसाठी कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही त्या कुचकामी ठरत आहेत.एक तर ही नदी वाहती नाही. उजनी धरणातून सोडलेले पाणी आणि कधी तरी पावसाचे प्रमाण वाढलेच तर नदी काही काळ वाहती होते. त्यानंतर पात्रातील पाणी स्थिर आणि साठवलेले अशा स्वरुपात दिसून येते.



त्यामुळे हे साठलेले पाणी दूषित होते. इथे येणारा भाविक स्नानाला आला की नदीची पूजा करून नारळ, फूल, ओटी भरतो. फाटके कपडे पाण्यात टाकून जातो. अशा या ना त्या कारणाने नदी पात्रात पाणी कमी आणि अशा प्रकारामुळे घाण होत आहे.पंढरीत चार प्रमुख वारी आणि दर महिन्याच्या दोन एकादशी अशा २८ प्रमुख एकादशी असतात.

या २८ एकादशीला भाविक स्नान करतोच. मात्र त्या वेळी नदी पात्रात पाणी कमी आणि घाण जास्त असेच प्रकार असतात. वास्तविक पाहता यात्रा संदर्भात प्रशासनाच्या बैठका होतात. मात्र याबाबत नुसती चर्चा होते. प्रत्यक्षात कारवाई होत नाही. याठिकाणी येणारा भाविक मोठ्या श्रद्धेने स्नान करतो आणि

**भीमेच्या उगमाचे थोडे अंतर सोडल्यावर ती दोन महापालिका, दहा नगरपालिका, दहा औद्योगिक वसाहती, खाजगी औद्योगिक क्षेत्रे, खाजगी व सहकारी साखर कारखान्यांसह जवळपास एक कोटी लोकसंख्येने निर्माण केलेल्या सांड पाण्याने नदी मरणासन्न अवस्थेत पोचल्याचे अभ्यासकांनी यापूर्वी समोर आणले. या पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण अनेक ठिकाणी शून्यावर पोचले असून, मानवी विष्ठेतील विषाणूंची संख्या प्रतिलिटर २ ते ५ हजारांवर पोचल्याचे स्फोटक वास्तव समोर आणले आहे. जे पाणी आजही लाखो भाविक पिण्यासाठी वापरातात. लाखो वारकरी पवित्र तीर्थ म्हणून घेतात, त्या पाण्यात मानवी विष्ठेतील सर्वात जास्त विषाणू असल्याचे भीषण वास्तव समोर आले असताना नमामी चंद्रभागा सारख्या योजना कागदोपत्रीच राहिल्याचे चित्र आहे.**

जातो. यात लक्ष घालून राज्य शासन कायमस्वरूपी प्रश्न सोडवेल का, असा सवाल आ. पाटील यांनी उपस्थित केला. अस्वच्छ आणि दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

फद्वरम्यान आ.अभिजीत पाटील यांनी चंद्रभागा नदी प्रदूषणाचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केल्यानंतर शासनाचे वतीने पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, चंद्रभागा नदी पात्रामध्ये घाण साचल्यासंदर्भातील तक्रार प्रदूषण महामंडळाकडे आली नसून ती सहाय्यक अभियंता जलसंपदा विभागाकडे प्राप्त झाली होती उन्हाळ्यामध्ये पाणी कमी झाल्याने नदीपात्रात काही ठिकाणी शेवाळे आणि घाणीचे साम्राज्य पसरले होते.

प्रदूषणासंदर्भात अशी कुठलीही तक्रार आमच्याकडे प्राप्त नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमामी गंगा योजनेच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री यांचे नेतृत्वात नमामी चंद्रभागा ही संकल्पना राबविण्यात येत असून यासाठी ४८ कोटीच्या प्र.मा. दिलेल्या आहेत यामध्ये ३४ कोटी नगरपकलिकेस दिले आहेत त्यापैकी १५ कोटी खर्च झाले आहेत. चंद्रभागा नदी प्रदूषण बाबतीत कुठलीही तक्रार कोणत्याही विभागास प्राप्त झाली असेल तर त्यावर तत्काळ कार्यवाही केली जाणार असल्याचे ना. मुंडे यांनी सांगितले.

# सायन पनवेल महामार्ग, रेल्वे स्थानके व परिसर स्वच्छतेकडे विशेष लक्ष

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१९, नवी मुंबई :** शहराची ओळख प्रामुख्याने स्वच्छ व सुंदर शहर असून यामध्ये नागरिकांच्या सहभागाचा मोठा वाटा आहे. नवी मुंबई महानगर पालिका शहर स्वच्छतेला विशेष प्राधान्य देत असते. महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांमध्ये सायन पनवेल महामार्ग हा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असून या महामार्गावर जड वाहनांची कायम वर्दळ असते. त्याचप्रमाणे जेएनपीटीकडे जाण्यासाठीही या रस्त्यावरुनच वाहतूक होते. त्यामध्ये बांधकाम साहित्य वाहून नेणाऱ्या जड वाहनांचाही समावेश होतो. त्यामुळे या रस्त्याची नियमित स्वच्छता हे एक आव्हान आहे.

यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे या महामार्गाच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष असून आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली या महामार्गाच्या दुतर्फा सातत्याने सखोल स्वच्छता मोहीमा आयोजित करण्यात येत असतात. येथील सातत्यपूर्ण स्वच्छतेबाबत आयुक्तांनी आढावा बैठकीत महानगरपालिकेच्या वतीने विशेष पथक गठीत करण्याचे निर्देश दिले असून या पथकाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या



अधिकाऱ्यांसमवेत नियमित संपर्कात राहून सायन पनवेल महामार्गावरील स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष देण्याचे व नियमित स्वच्छ राहील या कडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले आहेत. अशाच प्रकारे नवी मुंबईतील १२ रेल्वे स्थानके व परिसर येथील स्वच्छतेची जबाबदारी सिडको महामंडळाकडे असून सर्व रेल्वे स्थानके मोठया प्रमाणात वर्दळीची ठिकाणे आहेत. महामार्ग स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या पथकाने सिडकोच्या अखत्यारितील रेल्वे स्थानकांच्या स्वच्छतेकडेही बारकाईने लक्ष द्यावयाचे असून या कामी सिडकोच्या संबधित अधिकाऱ्यांशी नियमित संपर्कात राहून हे काम करुन घ्यावयाचे आहे असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये पूर्वेकडील बाजूस मोठया प्रमाणात एमआयडीसी क्षेत्र असून त्याठिकाणच्या स्वच्छतेकडेही प्राधान्याने लक्ष देण्याचे आयुक्तांमार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत. एमआयडीसी क्षेत्रात मोठया प्रमाणात दुर्लक्षित जागा असून अशा ठिकाणी रात्रीच्या वेळी डेब्रीज आणून टाकण्याचे प्रकार अनेकदा घडताना दिसतात. डेब्रीजमुळे शहर स्वच्छतेला बाधा पोहचते हे लक्षात घेऊन डेब्रीज विरोधी पथकांना अधिक सक्रिय करावे व एमआयडीसी अधिकाऱ्यांच्या सहकार्याने एमआयडीसी परिसरही स्वच्छ राहील याकडे विशेष लक्ष देण्याचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निर्देशित केले आहे.

स्वच्छ नवी मुंबईसाठी संबधित सर्व प्राधिकरणांचे सक्रिय सहकार्य अपेक्षित असून त्यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको, रेल्वे, एमआयडीसी अशा सर्व संबधित प्राधिकरणांशी सातत्यपूर्ण समन्वय ठेवून बारकाईने लक्ष देत नियमित काम करावे असे स्पष्ट निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले आहेत.

# मिलिंददादा पाटील यांच्या हस्ते सुखेड येथे सभामंडपाचे भूमिपूजन

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१९, खंडाळा (सातारा) :** मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद पाटील यांच्या माध्यमातून रु.१२ लाख किमतीच्या श्री लक्ष्मी माता मंदिर सभा मंडपाचे भूमिपूजन नामदार मकरंद पाटील यांचे जेष्ठ बंधू मिलिंद दादा पाटील यांचे हस्ते बुधवार, दि.१९ मार्च २०२५ रोजी सुखेड येथे खेड बु.गावचे माजी सरपंच गणेश धायगुडे, राष्ट्रवादी विध्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सचिव गजेंद्र मुसळे,सुखेड गावचे माजी सरपंच विद्यमान सदस्य भीमराव धायगुडे, युवा नेते अंकुश धायगुडे, संतोष धायगुडे, बाळासाहेब धायगुडे, विठ्ठल बोडरे, तात्याबा पडळकर,गावचे जेष्ठ नागरिक सदाशिव धायगुडे (आबा), संदीप रासकर,उत्तम वाघमारे, देवचंद वाघमारे, विकास वाघमारे, रुपेश धायगुडे, वसंत



वाघमारे, भाऊसो गुलदगड आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सुखेड गावातील श्री लक्ष्मी माता मंदिराची बरीच पडझड झालेली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सुखेड व सुखेड ग्राम पंचायतच्या वतीने नामदार मकरंद पाटील यांच्याकडे या मंदिराचे सभामंडपसाठी मागणी करण्यात आली होती. यामागणीला तात्काळ प्रतिसाद देत नामदार पाटील यांनी रु. १२ लाख निधीचा सभामंडप मंजूर करून दिला आणि आज या सभामंडपाचे भूमिपूजन नामदार मकरंद पाटील यांचे जेष्ठ बंधू मिलिंद दादा पाटील यांचे हस्ते करण्यात आले. गत ४ वर्षात ना.मकरंद पाटील यांच्या माध्यमातून सुखेड गावातील विविध विकास कामे करण्यात आली असून काही विकास कामे सुरु आहेत.सुखेड गावास जवळपास ४ ते ५ कोटींची विकासकामे नामदार मकरंद पाटील यांचेकडून देण्यात आली आहेत. यासाठी सुखेड ग्रामपंचायत व सुखेड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने ना.पाटील यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे.

याप्रसंगी बोलताना ॲड.गजेंद्र मुसळे यांनी सांगितले की, सदर मंदिराची खूपच पडझडं झालेली होती. सुखेड ग्रामस्थांची या मंदिर सभामंडपाची मागणी होती.यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सुखेड ग्रामपंचायत सरपंच व सदस्य यांनी नामदार मकरंद पाटील यांचेकडे यामंदिर सभामंडपाची मागणी केली असता ती मान्य करून त्यांनी १२ लक्ष रु.सभामंडपसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल सुखेड ग्रामस्थ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सुखेड नामदार मकरंद पाटील यांचे आभारी असून यापुढील काळात देखील सुखेड गावातील इतर विकास कामे ना.मकरंद पाटील यांच्या माध्यमातून पूर्ण व्हावीत.

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस प्रदेश सचिव सुखेड गावचे सुपुत्र ॲड.गजेंद्र मुसळे यांचा वाढदिवस यावेळी केक कापून साजरा करण्यात आला. जेष्ठ नेते मिलिंद पाटील आणि उपस्थित मान्यवर आणि सुखेड ग्रामस्थांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. ॲड.गजेंद्र मुसळे यांनी सर्वांचे आभार मानले.

# थोडक्यात

## अनुकल्प वानखडे प्रज्ञाशोध परीक्षेच्या गुणवत्ता यादीत



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१९, विंचूर (नाशिक) :** रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत रयत शिक्षण संस्थेतील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना अधिक मार्गदर्शन करण्यासाठी दरवर्षी इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांसाठी रयत प्रज्ञाशोध परीक्षा आयोजित केली जाते. सन २०२४-२५ आयोजित परीक्षेत विद्यालयातील इयत्ता सातवीतील एकूण ५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी अनुकल्प अजय वानखेडे हा विद्यार्थी २०० मार्क पैकी १६० मार्क मिळवून गुणवत्ता यादीत आला आहे. या विद्यार्थ्याला विभाग प्रमुख पाटील ए.एच व नागणे बी.आर तसेच विषय शिक्षक निकम एम.एस गणित, खोंडे एन.सी समाजशास्त्र व सामान्य ज्ञान, आत्राम ए.ए बुद्धिमत्ता, खरात ए.जी मराठी, खरात एस. ए इंग्रजी, जाधव व्हि. पी विज्ञान यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थी, त्याचे पालक, मार्गदर्शक शिक्षक व विभागप्रमुख यांचे रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन भगीरथजी शिंदे, जनरल बॉडी सदस्य डॉक्टर सुजित गुंजाळ, उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे सदस्य सुनील मालपाणी, विभागीय अधिकारी व सहाय्यक विभागीय अधिकारी, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष पंढरीनाथ दरेकर, उपाध्यक्ष कैलास सोनवणे, जगदीश काका जेऊघाले, अनिल दरेकर, सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, पालक शिक्षक संघ, माता पालक संघाचे सर्व कार्यकारिणी सदस्य, विंचूर व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पत्रकार, माजी विद्यार्थी, डॉक्टर असोसिएशन तसेच विद्यालयाचे प्राचार्य एन.ई.देवढे, पर्यवेक्षक के.जी.जोपळे, लाईफ मेंबर आर.के.चांदे, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## तरुणांनी अमली पदार्थ पासून दूर राहा डॉ. डोंगरे यांचे आव्हान

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१८, अलिबाग (रायगड) :** सुरभी स्वयंसेवी संस्था अलिबाग व राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था व सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार यांच्यावतीने अलिबाग मध्ये जे एस एम कॉलेज दत्ता पाटील लॉ कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी अमली पदार्थ सेवन व त्याचे दुष्परिणाम याबाबत विशेष मानसोपचार तज्ञ डॉ.अनिल डोंगरे यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. यामध्ये भांग, गांजा, चरस इत्यादी अमली पदार्थ पासून लिव्हर, मेंदु ,स्मृती भंशहोणे, अल्कोहोलमुळे विपरीत परिणाम शरिरावर होतात. दारूचे आकर्षण एक मानसिक रोग आहे. तंबाखू, दारू, गांजा हे समाजाला लागलेले व्यसन म्हणजेच मानसिक रोग आहे. यामध्ये कारणीभूत असणारे चित्रपटातील गाणी फिल्म बढाई मारणे.... दम मारो दम या गाण्याने तरुणांना व्यसनाच्या आहारी जाण्यासाठी प्रोत्साहितच केले असे वाटते आहे. नितीन राऊत यांनी विद्यार्थ्यांना अंधश्रद्धा व व्यसन या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे सांगितले असून सूशिक्षित लोक अंधश्रद्धेच्या आहारी गेले आहेत. रूढी परंपरेने समाजाला विकास घातला आहे. प्रत्येक सण उत्सवामध्ये दारू पिल्या शिवाय सण साजरे होत नाहीत असे सांगितले. त्यामुळे समाजाला प्रतिबंध घालण्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे. सुप्रिया जेधे यांनी व्यसन कशामुळे लागते त्याची कारणे सांगितली. ३१ डिसेंबर गटारी लग्न समारंभ, वाढदिवस, पिकनिक पार्टी, निवडणुकीचा प्रचार यामध्ये तरुणाई बुडाली आहे व व्यसनाच्या आहारी जात आहे. ॲड.दत्ता पाटील लॉ कॉलेजच्या प्राचार्य ॲड. नीलिमा हजारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आभार प्रदर्शन केले.

## रविवारी कळव्यात रंगणार शिमगोत्सव आणि पालखी नृत्यस्पर्धा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, ठाणे :** गणेशोत्सवासह शिमगोत्सव हा कोकणी चाकरमान्यांचा अत्यंत आत्मियतेचा सण या सणासाठी ठाणे- मुंबईतील अनेक चाकरमानी आवर्जुन गावी जात असतात. मात्र, ज्यांना काही कारणांनी गावी जाणे शक्य नाही. त्यांच्यासाठी 'संघर्ष' या सेवाभावी संस्थेच्या वतीने डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनानुसार कळवा येथे शिमगोत्सवासह भव्य पालखी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि.२३ मार्च, २०२५ रोजी दुपारी ४ वाजता कळवा येथील भूमिपुत्र मैदान, खारलँड- कळवा येथे हा कोकणचा शिमगोत्सव पारंपारिक प्रकारे साजरा करण्यात येणार आहे. या प्रसंगी रत्नागिरीतील उक्षी या गावाची जागृत ग्रामदेवता देवी वाघजाई मातेची पालखी देवीचा कौल घेवून आणण्यात येणार आहे. या पालखी उत्सवानिमित्त पालखी नृत्य स्पर्धेचेही आयोजन केले असून, रत्नागिरी व रायगड या जिल्ह्यांमधील अनेक नामवंत पालखी नृत्य संघ सहभागी होणार आहेत. या निमित्ताने कोकणातील पालखी उत्सव आणि देखाव्यांसह पारंपारिक पालखी नृत्य हे ठाणे-मुंबईकरांना अनुभवता येणार आहे. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच रत्नागिरीतील आंबेशेत येथील महिला पथक पालखी नृत्य सादर करणार आहे.

या स्पर्धेतील प्रथम विजेत्यास १ लाख ५१ हजार रुपये व आकर्षक चषक, द्वितीय विजेत्यास १ लाख १ हजार रुपये व आकर्षक चषक, तृतीय विजेत्या संघाला ५१ हजार रुपये व आकर्षक चषक तर सर्व सहभागी संघाना प्रत्येकी २५ हजारांचे उत्तेजनार्थ पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी अरूण नागवेकर (वांद्री,ता.संगमेश्वर) ९४०५०८००८५ आणि अरविंद मोरे ९८१९०९५०४७ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर उभारणीत पनवेल महानगरपालिका अग्रेसर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, पनवेल :** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर उभारणीत दिलेले उदिष्ट १०० टक्के साध्य करून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल केंद्र शासनाच्यावतीने राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक यांनी पत्राद्वारे महापालिकेचे कौतुक केले आहे.

नागरी भागातील अतिशय दाटीवाटीने वसलेल्या गृह निर्माण संस्था तसेच झोपडपट्टी सदृश भागात आरोग्य सेवांपासून वंचित असलेल्या क्षेत्रात प्राथमिक आरोग्य संस्थांना सक्षम करण्यासाठी तसेच सातत्यपूर्ण आरोग्य गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करण्यासाठी, राष्ट्रीय नागरी अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतात. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून विविध रोगांच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण आणि नियंत्रण करण्यासाठी, तसेच सुलभ आणि परवडणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा प्रदान करून आरोग्य निर्देशांक वाढविण्याकरीता केंद्र शासनाकडून १५ वा वित्त आयोग अंतर्गत राज्य स्तरावर एकुण २ हजार २३२ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर मंजूर करण्यात आलेली आहेत. या अंतर्गत पनवेल महानगरपालीकेस ९ इतकी नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर मंजूर करण्यात आलेली आहे. त्या पैकी सर्व आयुष्मान आरोग्य मंदिर आयुक्त मंगेश चितळे यांच्या नेतृत्वाखाली उपायुक्त डॉ.वैभव विधाते व मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यान्वित करून महापालिकेने १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केलेले आहे. १५ व वित्त आयोगाचा विहित कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच महापालिकेने निश्चित करून दिलेले उदिष्ट १०० टक्के पूर्ण केले ही अतिशय उल्लेखनीय व स्पृहणीय बाब असल्याचे केंद्र शासनाने दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

हे उदिष्ट पूर्ण करताना जागा निश्चित करणे, मनुष्यबळ भरती अशा विविध स्तरांवर येणाऱ्या अडचणीवर मात करून महापालिकेने आपल्या कार्यक्षेत्राचे १०० टक्के उदिष्ट साध्य केले आहे. यातून महापालिकेचा आरोग्याप्रती असलेला सकारात्मक दृष्टीकोन दिसून येतो. या उदिष्टपूर्ती बद्दल केंद्र शासनाने पत्राच्या माध्यमातून महापालिकेचे कौतुक केले आहे. तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रशंसा केली आहे. शहरी भागामध्ये अश्या प्रकारे नव्याने आरोग्य संस्था सुरु करण्यामध्ये येणारी आव्हाने व अडचणी यावर मात करून आपण एक चांगले उदाहरण प्रस्थापित केले असल्याचे पत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे.